...Action Taken Circular

**कार्यकारी प्राधिकरणे विभाग**

**मुंबई विद्यापीठ**

क्र.काप्रावि/कार्यवाही/१२/२०१३

**परिपत्रक :**

व्यवस्थापन परिषदेने दिनांक **०८ जानेवारी, २०१३** च्या सभेत विद्यापीठ अधिकारी आणि संबंधित विभाग प्रमुख यांच्याकडून आलेल्या प्रत्येक बाबीवर घेतलेले निर्णय मूळ कागदपत्रासह संबंधित विभागाकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. त्यांना अशी विनंती करण्यात येते की, विभागाने त्या निर्णयावर कार्यवाही करून त्यासंदर्भात संबंधिताना पाठविलेली पत्रे/परिपत्रके/आदेश यांच्या प्रती (असल्यास) या विभागाने पाठविलेल्या परिपत्रकाचा क्रमांक व तारीख तसेच व्यवस्थापन परिषदेच्या सभेची तारीख आणि बाब क्रमांक यांचा उल्लेख यासह कार्यवाही अहवाल **दिनांक १६ फेब्रुवारी, २०१३ रोजी किंवा तत्पूर्वी सहायक कुलसचिव, कार्यकारी प्राधिकरणे विभाग यांच्याकडे पाठवावा.**

| विभाग | बाब क्रमांक | घेणा-याची सही |
|---|---|---|
| संचालक,<br>विद्यार्थी कल्याण विभाग (D.S.W.) | १३ | |
| वित्त व लेखा अधिकारी,<br>वित्त व लेखा विभाग<br>(Finance & Accounts) | ३, ४, ८ | 1/2/13 |
| उपकुलसचिव,<br>आस्थापना विभाग<br>(Establishment Section) | ७, ९, ११, १४, १८, १९ | 1.2.13 4.45 pm. |
| उपकुलसचिव,<br>विद्याविषयक प्राधिकरणे विभाग<br>(A.A.U.) | १० | |
| उपकुलसचिव,<br>अध्यापक नियुक्ती विभाग<br>(T.A.U.) | ६, १७ | Original no. 6 recd. Original no. 17 not received. 01/2/13 |
| उपकुलसचिव,<br>तक्रार निवारण कक्ष<br>(Grievances Section) | ५ | 1.2.2013 |
| उप-कुलसचिव,<br>संलग्नता/मान्यता विभाग<br>(Affiliation Section) | लॉर्डस महाविद्यालयातील शिक्षकांची रिक्त पदे, विद्यार्थ्यांचे निकाल आणि महाविद्यालयांच्या स्थलांतर या प्रकरणाबाबतचा ठराव. | 02/2/13 |
| सहायक कुलसचिव,<br>विद्याविषयक नियोजन व विकास विभाग (A.P.D.) | १५, १६ | P. S. 1.2.13 |
| सुरक्षा अधिकारी,<br>सुरक्षा विभाग<br>(Security Department) | २० | 01/02/2013 |

मुंबई - ४०० ०३२.
०१ फेब्रुवारी २०१३.

कुलसचिवांकरिता.

1/2/2013

Scanned by CamScanner

मसुदा
क्र.७/२०१२-२०१३

गोपनीय
व्यवस्थापन परिषद
०८ जानेवारी, २०१३

## मुंबई विद्यापीठ

व्यवस्थापन परिषदेची सभा विद्यापीठाचे सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, फोर्ट, मुंबई- ४०० ०३२, येथे ***मंगळवार, दिनांक ०८ जानेवारी, २०१३ रोजी सकाळी ११.३०*** वाजता सुरू झाली. सभेमध्ये खालील नमूद केल्याप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

१. डॉ. राजन वेळूकर (कुलगुरू)
२. डॉ. नरेश चंद्र (प्र-कुलगुरू)
३. डॉ. सुरेश कि. उकरंडे
४. डॉ. गुरूनाथ वा. पंडीत
५. श्री. राजाराम जाधव
६. श्री. दयानंद मेश्राम
७. डॉ. (श्रीमती) एम. एस. मोलवणे
८. डॉ. प्रल्हाद जी. जोगदंड
९. प्राचार्य (डॉ.) राजपाल एस. हांडे
१०. प्राचार्य दत्ताजीराव यशवंतराव पाटील
११. प्राचार्य गोरक्ष व्ही. पारगांवकर
१२. डॉ. बाळकृष्ण वि. भोसले
१३. डॉ. वसंत सिताराम शेकडे
१४. डॉ. (श्रीमती) मधू सुधीर परांजपे
१५. श्री. गजानन (उर्फ) दिलीप अंबाजी करंडे
१६. प्राचार्य डॉ. अशोक पा. महाजन
१७. डॉ. विजय भालचंद्र जोशी
१८. डॉ. सिध्देश्वर तुकाराम गडदे
१९. श्री. संजय बा. शेटे

श्री. दिपक जी. वसावे, प्रभारी परीक्षा नियंत्रक आणि श्री. अ.आ. फळणीकर हे कायम निमंत्रित म्हणून उपस्थित होते.

सर्वप्रथम कुलगुरूंनी व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे स्वागत केले.

सभेला सुरूवात करताना कुलगुरूंनी सांगितले की, डॉ. विजय भालचंद्र जोशी यांनी कळविले आहे की, ते या सभेस उपस्थित राहू शकणार नसल्याने त्यांना या सभेत अनुपस्थित राहण्यास परवानगी द्यावी अशी त्यांनी विनंती केली.

व्यवस्थापन परिषदेने डॉ. विजय भालचंद्र जोशी यांची या सभेस अनुपस्थित राहण्याची विनंती मान्य केली.

मुंबई विद्यापीठाच्या वित्त व लेखा अधिकारी या पदावर श्री. अ. आ. फळणीकर यांची नियुक्ती करण्यात आली. विद्यीठातर्फे व व्यवस्थापन परिषदेतर्फे त्यांचे स्वागत करण्यात आले.

यानंतर, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, आचार्य पार्वतीकुमार, श्री. इंद्रकुमार गुजराल यांच्या दुःखद निधनाबद्दल परिषदेस पुढीलप्रमाणे माहिती देण्यात आली व श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

Scanned by CamScanner

➢ **श्रध्दांजली –**

**शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे**

गेली चार दशके महाराष्ट्राच्या राजकारणावर अवीट छाप उमटविलेले व लाखो शिवसैनिकांचे पंचप्राण शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे दि. १७ नोव्हेंबर, २०१२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८६ वर्षांचे होते. आपल्या कुंचल्यांनी 'मार्मिक' या नियतकालीकातून भल्याभल्यांची भंबेरी उडविणारे तसेच आपल्या दमदार नेतृत्वाने व प्रखर भूमिकेने राजकीय जिवनात कार्य करण्याची संधी हजारो-लाखोंना मिळवून देणारे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हे एकमेव नेते होते.

**आचार्य पार्वतीकुमार**

भारतीय शास्त्रीय नृत्याला जागतिक स्तरावर नावलौकिक मिळवून देणारे दिग्गज नृत्य दिग्दर्शक, नृत्य गुरू व भारतीय नृत्याचे अभ्यासक आचार्य पार्वतीकुमार यांचे दि. २९ नोव्हेंबर, २०१२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९४ वर्षांचे होते. त्यांना अखिल भारतीय नाटय परिषदेचा पुरस्कार, संगीत नाटक अकादमी पुरस्कार, चतुरंग प्रतिष्ठानचा जीवनगौरव पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले होते.

**श्री. इंद्रकुमार गुजराल**

सन १९९० च्या दशकाअखेर आघाडी सरकारचे नेतृत्व केलेले भारताचे माजी पंतप्रधान श्री. इंद्रकुमार गुजराल यांचे दि. ३० नोव्हेंबर, २०१२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९२ वर्षांचे होते.

➢ **निषेध –**

**दिल्लीत घडलेल्या अमानुष मानवी घटनेबद्दल सर्व व्यवस्थापन परिषदेने निषेध व्यक्त केला.**

➢ **अभिनंदन –**

हिंदुजा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी. ए. शिवारे यांची इंडियन कॉमर्स असोसिएशन या संघटनेच्या अध्यक्षपदी निवड झाली.

➢ भारत सरकारच्या युवा व क्रीडा मंत्रालयातर्फे दिला जाणारा २०११-१२ चा 'इंदिरा गांधी एनएसएस राष्ट्रीय पुरस्कार' मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा. अतुल साळुंखे यांना आणि विवा महाविद्यालयाचा विद्यार्थी भूपेंद्र मिश्रा याला 'उत्कृष्ट स्वयंसेवक' पुरस्कार बहाल करण्यात आला. हा पुरस्कार नवी दिल्ली येथे भारताचे राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

➢ संगीत नाटक अकादमी २०१२ चा उत्कृष्ट दिग्दर्शनाच्या पुरस्कारासाठी श्री. वामन केंद्रे यांची निवड करण्यात आली.

➢ संगीत नाटक अकादमी २०१२ चा उत्कृष्ट लावणी पुरस्कारासाठी सुलोचना चव्हाण यांची निवड करण्यात आली. या मुंबई विद्यापीठाच्या लोककला विभागाच्या मानद व्याख्याता आहेत.

➢ संगीत नाटक अकादमीतर्फे २०१२ चा बिसमिला खान युवा पुरस्कार कृष्णा मुसळे यांना प्रदान करण्यात आला.

➢ मुंबई विद्यापीठातील संस्कृत विभागाच्या विभागप्रमुख डॉ. उमा वैद्य यांची कालिदास संस्कृत साधना पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

➢ मुंबई विद्यापीठातील गरवारे व्यवसाय शिक्षण व विकास संस्थेचे संचालक डॉ. रामभाऊ बडोदे यांना २०१२ च्या देवांग मेहता बिझनेस स्कुल ॲवार्डसाठी निवड करण्यात आली.

Scanned by CamScanner

➢ महाराष्ट्र राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्यावतीने मुंबई विद्यापीठातील इंग्रजी विभागाच्या विभागप्रमुख डॉ. कुमी एस. विवैना यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

➢ महाराष्ट्र राज्याच्या हिंदी साहित्य अकादमीतर्फे दिला जाणारा २०११ चा आचार्य महावीर प्रसाद द्विवेदी हिंदी भाषा पुरस्कार डॉ. करूणाशंकर उपाध्याय यांना प्रदान करण्यात आला.

➢ मुंबई विद्यापीठाच्या अल्केश दिनेश मोदी वित्तीय व व्यवस्थापन अभ्यासक्रम संस्थेला देवांग मेहता ॲवार्ड, एबीपी न्यूज इंटरफेस ॲवार्ड व एबीपी न्यूज सिलॅबस इन फायनान्स ॲवार्ड प्रदान करण्यात आला.

➢ महत्वाच्या घडामोडी:-

➢ दिनांक २२ ऑक्टोबर, २०१२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेपासून विद्यापीठातील शैक्षणिक क्षेत्रामध्ये घडलेल्या काही महत्वाच्या घडामोडी आपल्यापुढे सादर करण्यात येत आहेत -

➢ दि. २९ ऑक्टोबर, २०१२ रोजी मुंबई विद्यापीठातील ॲकडमी ऑफ थिएटर आर्टस विभागातून संत नामदेवांच्या ७४२ व्या जयंतीचे औचित्य साधून मुंबई विद्यापीठात प्रथमच 'नामा म्हणे' या किर्तन आविष्काराचे आयोजन विद्यानगरी परिसरातील फिरोजशहा मेहता भवन येथे आयोजित करण्यात आला होता.

➢ मुंबई विद्यापीठाच्या वुमन डेव्हलपमेंट सेल आणि एनएसएस युनिटतर्फे कन्यारत्न अभियान चालविले गेले होते या अभियानाअंतर्गत 'मेरी बेटी प्यारी बेटी' या विषयावर आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा आयोजीत करण्यात आल्या होत्या. दि. ३० नोव्हेंबर, २०१२ रोजी या स्पर्धेची अंतिम फेरी ३० नोव्हेंबर रोजी कलिना विद्यानगरी येथे झाली.

➢ दि. २८ ते ३० डिसेंबर, २०१२ रोजी ७३ व्या भारतीय इतिहास कॉंग्रेस चे आयोजन मुंबई विद्यापीठातील विद्यानगरी परिसरात करण्यात आले. इतिहासाविषयी वस्तुनिष्ठ, धर्मनिरपेक्ष आणि शास्त्रीय लिखाणाला प्रोत्साहन देण्याच्या उद्‌शाने या अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास महाराष्ट्राचे राज्यपाल के. शंकरनारायणन, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री राजेश टोपे, राज्यमंत्री डी. पी. सावंत, भारतीय इतिहास परिषदेचे अध्यक्ष वाय. सुब्बरायलू व २००० प्रतिनिधी उपस्थित होते.

➢ दि. ३० डिसेंबर, २०१२ रोजी मुंबई विद्यापीठाच्या दीक्षान्त सोहळयाचे आयोजन फोर्ट येथील सर कावसजी सभागृहात करण्यात आले होते. या कार्यक्रमास राष्ट्रपती प्रणव मुखर्जी प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित होते. विद्यापीठात प्रथमच राष्ट्रपती दिक्षान्त सोहळयास प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित होते

➢ दि. ३ ते ६ जानेवारी, २०१३ रोजी मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी परिसरात बहि:शाल विभाग व संजीवन ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने पाळीप प्राण्यांचे प्रदर्शन ठेवण्यात आले होते. या प्रदर्शनास मुंबईतील जनतेचा प्रचंड प्रतिसाद लाभला.

७३ व्या भारतीय इतिहास कॉंग्रेस चे आयोजनया कार्यक्रमास महाराष्ट्राचे राज्यपाल के. शंकरनारायणन, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री राजेश टोपे तसेच विद्यापीठात प्रथमच राष्टपती दिक्षान्त सोहळयास प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित राहिले म्हणून सर्व व्यवस्थापन परिषदेने कुलगुरूंचे अभिनंदन केले.

<u>बाब १:</u> दिनांक २२ ऑक्टोबर, २०१२ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेच्या इतिवृत्ताची नोंद घेण्यात आली.

महाविद्यालयांच्या नावनोंदणी संबधीची विद्यापीठाच्या नावनोंदणी विभागात प्रलंबित प्रकरणाबाबत असा ठराव करण्यात आला की, विद्यार्थ्यांचे नावनोंदणीसाठीचे अर्ज विद्यापीठाकडे उशीरा पाठविणा-या महाविद्यालयांची प्रकरणे तसेच अभ्यासक्रमास/तुकडीस/जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची विद्यापीठाची परवानगी नसतानाही अर्ज नावनोंदणी विभागाकडे पाठविली जातात

Scanned by CamScanner

अशा महाविद्यालयांची प्रकरणे दिनांक २१ ऑगस्ट, २०१२ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत बाब क्रमांक ८ नुसार गठीत करण्यात आलेल्या समितीकडे वर्ग करण्यात यावी.

तसेच लॉर्डस महाविद्यालयातील शिक्षकांची रिक्त पदे, विद्यार्थ्यांचे निकाल आणि महाविद्यालयांच्या स्थलांतराबाबत सन्माननीय श्री. दिलीप करंडे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने असा ठराव करण्यात आला की, शिक्षकांची रिक्त पदे, विद्यार्थ्यांचे निकाल आणि महाविद्यालयांच्या स्थलांतराबाबत सत्यशोधक समिती लवकरच पाठविण्यात यावी.

बाब २: असा ठराव करण्यात आला की, दिनांक २१ ऑगस्ट, २०१२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेच्या इतिवृत्तावरील कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.

बाब ३: असा ठराव करण्यात आला की, मे. शरद एस्. गायकवाड आणि कं., यांची सनदी लेखापाल सन २०११-२०१२ या वर्षासाठीचे लेखा परीक्षण शुल्क रू. १,५०,०००/- अधिक सेवाकर ऐवजी रू. २,००,०००/- अधिक सेवाकर ऐवढे वाढविण्यात आले.

बाब ४: असा ठराव करण्यात आला की, सन २०१२-२०१३ वर्षाचे लेख्यांचे लेखापरिक्षण करण्यासाठी मेसर्स गोखले आणि साठे यांची सनदी लेखापाल म्हणुन नियुक्ती करण्यात आली.

पुढे असाही ठराव करण्यात आला की, लेखापरिक्षण शुल्क रू. ३,००,०००/- अधिक सेवाकर देण्याचे मान्य करण्यात आले. तसेच मेसर्स गोखले व साठे यांनी केलेली पॉकीट खर्चासाठीची विनंती नामंजूर करण्यात आली.

बाब ५: असा ठराव करण्यात आला की, दिनांक २१ जानेवारी, २०१२ रोजी संपन्न झालेल्या तक्रार निवारण समितीच्या ठरावास मान्यता देण्यात आली.

बाब ६: असा ठराव करण्यात आला की, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सन २०१० च्या रेग्युलेशननुसार विद्यापीठातील विविध विभागातील शिक्षकांना सहायक प्राध्यापक/समकक्ष (स्टेज १ ते स्टेज २) (सी.ए.एस.) आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत दिनांक १९ जुलै, २०१२ रोजी संपन्न झालेल्या छाननी व मुल्यमापन समितीच्या अहवालातील उमेदवार अनुक्रमांक १, ८, १०, १२ आणि १३ वरील वगळून मान्य करण्यात आला.

पुढे असाही ठराव करण्यात आला की, छाननी व मुल्यमापन समितीच्या अहवालातील उमेदवार अनुक्रमांक १, ८, १०, १२ आणि १३ पुन्हा तपासून व्यवस्थापन परिषदे पुढे सादर करावे.

बाब ७: असा ठराव करण्यात आला की, शासन निर्णय क्रमांक आरटीआर-१०८५/८५३/प्र.क्र. ७२-८५/तेरा, दिनांक १५ एप्रिल, १९९१ अन्वये गट 'ड' मधील कर्मचा-यांना गट 'क' मधील कनिष्ठ लिपिक या पदावर पदोन्नतो देण्याबाबतचा ठराव एक वर्षात त्यांनी त्यांची शैक्षणिक अर्हता पूर्ण करावी हया अटीवर मान्य करण्यात आला.

पुढे असाही ठराव करण्यात आला की, गट 'ड' मधील कर्मचा-यांन पैकी गट 'क' मध्ये पदोन्नती दिलेल्या कर्मचा-यांची एका वर्षात शैक्षणिक अर्हता पूर्ण न केल्यास त्यांना पदावन्नत करण्यात येईल.

बाब ८: असा ठराव करण्यात आला की, वित्त व लेखा समितीच्या दिनांक ९ नोव्हेंबर, २०१२ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त पुढील सुधारणासह मान्य करण्यात आले.

बाब क्रमांक : ५,
पान क्रमांक ३.

"अर्थसंकल्प छाननी समितीवर डॉ. अनुपमा सांवत, डॉ. जालिदंर अडसूळे, श्रीमती निलीमा भुर्के, श्री. सुधाकर तांबोळी, प्राचार्य मारोती भगत, प्राचार्य (श्रीमती) ॲन्सी जोस, यांचा समावेश करण्यात आला"

Scanned by CamScanner

बाब ९: असा ठराव करण्यात आला की, दिनांक २१ ऑगस्ट, २०१२ रोजी व्यवस्थापन परिषदेत बाब क्र.१२ च्या ठरावामध्ये खालील प्रमाणे दुरूस्ती करण्यात आली.

"विद्यापीठाच्या परीक्षेच्या कामासाठी आणि विद्यापीठाच्या इतर कामासाठी मुंबई शहरात आणि मुंबई शहरा बाहेर जाणा-या कर्मचा-यांच्या भोजन भत्यामध्ये वाढ करण्यांत यावी."

बाब १०: असा ठराव करण्यात आला की, "सेंटर फॉर मरीन स्टडीज" च्या स्थापनेबाबत समिती गठीत करण्याचे अधिकार कुलगुरूंना देण्यात आले.

बाब ११: असा ठराव करण्यात आला की, विद्यापीठातील कर्मचा-यांना मंजुर करण्यात आलेल्या अतिकालीक भत्याच्या दरामध्ये (Overtime allowance) वाढ करण्याबाबत प्रस्तावास पुढील प्रमाणे मंजूरी देण्यात आली.

| अ. क. | तांत्रिक व अतांत्रिक पदांची वेतनसंरचना | ६व्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने पुणे विद्यापीठाने मान्य केलेले दर | मुंबई विद्यापीठ कर्मचा-यांसाठी प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| १. | दफ्तरी, हवालदार, शिपाई, सुरक्षारक्षक आणि समांतर संवर्ग 1.एस रू. 4440-7440 ग्रेड वेतनरू. 1800,1650,1600, 1300 | ३५ | ४०/- |
| २. | कनिष्ठ लिपिक आणि समांतर संवर्ग पी.बी.-रू 5200 -20200 ग्रेड वेतन रू. 2000, 1900 | ३५ | ४५/- |
| ३. | कनिष्ठ ग्रंथपाल सहाय्यक /वरिष्ठ लिपिक आणि समांतर संवर्ग पी.बी.-1रू.5200-20200 ग्रेड वेतन रू. 2800, 2400 | ४० | ५०/- |
| ४. | मुख्य लिपिक व समांतर संवर्ग पी.बी.-2रू.9300-34800 ग्रेड वेतन रू. 4200आणि 4300 | ४५ | ५५/- |
| ५. | अधिक्षक आणि समांतर संवर्ग पी.बी.-2रू.9300-34800 ग्रेड वेतन रू. 4400आणि 4600 | ५० | ६०/- |

बाब १२: असा ठराव करण्यात आला की, नावनोंदणी/पात्रता व स्थलांतर प्रमाणपत्र विभागाचे संगणकीकरण करत असताना प्रचलित कार्यपद्धतीमध्ये आवश्यक ते बदल करण्याबाबतचा प्रस्ताव मान्य करण्यात आला.

बाब १३: असा ठराव करण्यात आला की, मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागातून राबविण्यात येणा-या विविध योजनांतर्गत संलग्नित महाविद्यालये/विद्यापीठ विभागातील विद्यार्थ्यांना वाटप होणा-या निधीसाठी खालील समिती गठीत करण्यात आली.

१) श्री. कुमार खैरे, कुलसचिव,
२) प्राचार्य (डॉ.) राजपाल एस. हांडे, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ,
३) श्री. अ.आ., वित्त व लेखा अधिकारी,
४) डॉ. प्रल्हाद जी. जोगदंड,
५) डॉ. सिध्देश्वर तुकाराम गडदे,
६) डॉ.(श्रीमती) शोभा पंडित,
७) प्रा. बी. आर. साळवी,
८) डॉ.(श्रीमती) शिल्पा ज. सप्रे. भारमल,

Scanned by CamScanner

९) प्राचार्य (डॉ.) नरेंद्र परशुराम तेंडूलकर,
१०) प्राचार्य गोरक्ष व्ही. पारगांवकर,
११) प्रा. सुरेश किसनराव उकरंडे,
१२) डॉ. विजय भालचंद्र जोशी
१३) प्राचार्य (डॉ.) संदेश जगदाळे
१४) श्री. बी. ए. राजपाल
१५) डॉ. वसंत एस् शेकडे
१६) प्रा. विठल बी. रोकडे
१७) श्री. संजय टी. वैराळ
१८) श्री. राजन व्ही. कोंळबेकर
१९) श्री. अनिल पाटिल
२०) संचालक, (डी.एस.डब्लू) (सदस्य सचिव)

बाब १४: असा ठराव करण्यात आला की, मुंबई विद्यापीठातील सुरक्षा रक्षक यांचा "शिपाई" पदावर संवर्ग बदल (Cader Change) करणेबाबत प्रस्ताव तपासून व्यवस्थापन परिषदे पुढे पुन्हा सादर करावा.

बाब १५: असा ठराव करण्यात आला की, सी.एस.आय.आर. नॅशनल इनस्टियुट ऑफ ओशियानोग्राफी, गोवा आणि मुंबई विद्यापीठ या दोन संस्थेमध्ये शैक्षणिक सहकार्याबाबतचा करारनामा मान्य करण्यात आला.

बाब १६: असा ठराव करण्यात आला की, पॅरिस विद्यापीठ १३ आणि मुंबई विद्यापीठ या दोन विद्यापीठांमध्ये शैक्षणिक सहकार्याबाबतचा करारनाम्यास मान्यता देण्यात आली.,

डॉ. राजपाल हांडे, संचालक BCUD यांनी मागील पाच वर्षाचा विद्यापीठा सोबत शैक्षणिक देवाण घेवाणबाबत विविध विद्यापीठाबरोबर झालेल्या करारनाम्याचा तक्ता व्यवस्थापन परिषदेच्या सभेत सदर केला असता, सदर माहितीचा तक्ता व्यवस्थापन परिषदे पुढे उशिरा का सादर केला याबाबत सन्माननीय सदस्य श्री. दिलीप करंडे यांनी विचारणा केली असता विद्याविषयक नियोजन व विकास विभाग सहायक कुलसचिव व वरिष्ठ लिपीकाची पदे चार महिन्यापासून रिक्त असल्याबाबतचा खुलासा सभागृहास केला.

बाब १७: असा ठराव करण्यात आला की, शिक्षकीय पदांसाठी थेट मुलाखत (महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ नुसार) घेण्यात येत असल्याने प्रत्येक प्रवर्गामध्ये एका पदासाठी किती उमेदवारांना मुलाखती साठी बोलविण्यात यावे याबाबत नियम / मार्गदर्शक तत्वे तयार करण्याचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदे पुढे पुन्हा सादर करावा.

बाब १८: असा ठराव करण्यात आला की, विविध पदांसाठी असलेली शैक्षणिक अर्हता तसेच वर्ग 'अ' 'ब' 'क' व 'ड' मधील शिक्षकेत्तर अधिकारी/कर्मचा-यांच्या जाहिरातीनुसार निवड प्रक्रियेने होणा-या सर्व नियुकत्या सामायीक परिनियम आस्तित्वात येईपर्यंत महाराष्ट्र अकृषी विद्यापीठे आणि संलग्न महाविद्यालये प्रमाणसंहिता (शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या सेवा व शर्ती) नियमावली, १९८४ मधील सेवा प्रवेश वापरण्यास मान्यता देण्यात आली.

तसेच पढे असा ठराव करण्यात आला की, माहे जुलै २०१० पासून आजपर्यंत करण्यात आलेल्या नियुक्त्या व पदोन्नत्या महाराष्ट्र अकृषी विद्यापीठे आणि संलग्न महाविद्यालचे प्रमाणसंहिता (शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या सेवा व शर्ती) नियमावली, १९८४ मधील सेवाप्रवेशा नुसार मान्य करण्यात आल्या.

बाब १९ : असा ठराव करण्यात आला की, मुंबई विद्यापीठा मधील शिक्षकेत्तर कर्मचा-यांचा सेवाखंड क्षमपित करून प्रथम नियुक्ती (Initial Date) दिनांका पासून सेवा सलगता मिळण्याबाबतची प्रकरणे तपासण्यासाठी खालील समिती गठित करण्यात आली. सदर समितीने तपासलेली प्रकरणे पुन्हा व्यवस्थापन परिषदे पुढे मान्यतेसाठी सादर करावी असे ठरविण्यात आले.

१) डॉ. मधु परांजपे
२) डॉ. सिध्देश्वर तुकाराम गडदे
३) श्री. गजानन (उर्फ) दिलीप अंबाजी करंडे
४) श्री. अ. आ. फळनीकर (वित्त व लेखा अधिकारी)

Scanned by CamScanner

बाब २० : असा ठराव करण्यात आला की, हंगामी सुरक्षा रक्षकांच्या विविध समस्यांबावत गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल वित्त व लेखा अधिकारी यांनी तपासून पुन्हा व्यवस्थापन परिषदे पुढे सादर करावा.

मुंबई- -४०० ०३२
३१ जानेवारी, २०१३.

कुमार खैरे
कुलसचिव

Scanned by CamScanner